# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 12/11/2019 (मंगळवार)
## (सकाळ)

---

### जबरी चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत वार्ड क्र. 3, शिक्षक कॉलनी बुटीबोरी येथे दिनांक 11/11/2019 चे 16.00 वा.सुमारास फिर्यादी नामे– सौ. सरला वामन फुलझले, वय 56 वर्ष, रा. नगीनाबाग, वार्ड नं 1, चोखामेळा मुलींचे वस्तीगृहाजवळ चंद्रपुर यांच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र कि. 30,000/–रू. चे 25 ते 30 वर्षागटातील अज्ञात आरोपीने मोटरसायकलने येऊन बळजबरीने हिसकावुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. लगड 9923796904 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर खराडा पुनर्वसन मारोडी येथे दिनांक 11/11/2019 चे 11:30 वा. ते 14:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनोज विजय कावळे, वय 34 वर्ष, रा. खराडा पुनर्वसन मारोडी मौदा, नागपूर यांच्या घराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडून आत प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील सोन्या–चांदीचे दागिने कि. 44,500/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर तहसिल कार्यालय समोर कळमेश्वर येथे दिनांक 22/04/2019 चे 11:00 वा. ते 11:30 वा. पर्यंत फिर्यादी नामे– श्रीमती देवकाबाई अरून कसरे, वय 48 वर्ष, रा. तेलकामठी पो. स्टे. सावनेर ह. मु. मडकी चौक, सावनेर व आरोपी नामे– रमेश अण्णाजी कसरे, रा. तेलकामठी, ह. मु. धुरखेडा बोरगाव यांची सामलात शेती मौजा तेलकामठी शिवारात आहे. आरोपीने शेतात झालेल्या पिकाचे नुकसान भरपाईचे पैसे त्याला एकटयाला मिळावे म्हणुन 100 रू. चे स्टॅम्पवर खोटे संमतीपत्राचा लेख व सत्यापन तयार करून त्यावर फिर्यादी व तीचे नातेवाईकाच्या खोटया सहया करून अंगठे लावले तसेच आरोपीची आई मृत असल्यावरही त्या जिवंत असल्याचे दाखवुन त्यांचे नावाचे समोर दुसऱ्या कोणाचा तरी अंगठा लावुन ॲफीडेविड तयार केले. या कागदपत्राचा वापर करून शासनाची फसवणुक केली असल्याने फिर्यादीने दिलेल्या लेखी तक्रारीच्या चौकशी वरून दिसून आल्याने व मा.एसपीएनआर सा.व एसडीपीओ सा.सावनेर यांचे कडुन गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी विरुध्द कलम 420, 468, 471 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नारनवरे हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा – दिनांक 11/11/19 चे 10.00 वा. ते 21:00 वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही शाळेत जातो म्हणून निघुन गेली व घरी परत आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या कायदेशीर रखवालीतून मुलीला फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस हवालदार जंगवाड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर